POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१८४ ● मुंबई, गुरुवार, ०५ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# २४ तास उलटले... तरीही मुंबई-पुणे एक्सप्रेसवरील कोंडी सुटेना!!!




■ बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे

मंगळवारी ३ फेब्रुवारी संध्याकाळपासून रात्री उशिरापर्यंत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे हजारो प्रवाशांची गैरसोय झाली. हा द्रुतगती महामार्ग सहसा मुंबई आणि पुणे दरम्यानचा सर्वात जलद आणि सोपा मार्ग मानला जातो, परंतु एका अपघातामुळे २४ तासांहून अधिक काळ तो पूर्णपणे बंद राहिला. खंडाळा घाट विभागातील आडोशी बोगद्याजवळ एक टँकर उलटल्यानंतर परिस्थिती झपाट्याने बिघडली. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास प्रोपीलीन गॅस वाहून नेणारा टँकर उतारावर नियंत्रण गमावून रस्त्यावर उलटला तेव्हा हा अपघात झाला. टँकर उलटताच त्यातून गॅस गळू लागला. प्रोपीलीन गॅस अत्यंत ज्वलनशील असतो आणि लहानशी ठिणगी देखील मोठा स्फोट घडवू शकते. यामुळे घटनास्थळी उपस्थित असलेल्या चालकांमध्ये घबराट निर्माण झाली आणि प्रशासनाला तातडीने कारवाई करण्यास भाग पाडले.

आडोशी बोगद्याजवळ गॅस टँकर पलटी झाल्याने पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवरील पुणे-मुंबई लेनची वाहतूक तब्बल २० तासांहून अधिक काळ पूर्णतः ठप्प झाली होती. या घटनेचा परिणाम इतका तीव्र होता की आडोशी बोगदा ते सोमाटणे दरम्यान सुमारे ५० ते ५५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. या प्रचंड वाहतूक कोंडीत अडकलेल्या वाहनचालकांची अक्षरशः उपासमार झाली. पाणी, चहा आणि अन्नासाठी वाहनचालकांची धावपळ उडाली होती. अखेर उर्से टोलनाक्याजवळील ह्यकार्णीवलह्ण फूड मॉल वाहनचालकांसाठी एकमेव आधार ठरला. येथे चहा, पाणी व नाश्त्यासाठी मोठी गर्दी उसळली आहे. परिस्थिती इतकी गंभीर होती की कॅश काऊंटरवर कूपन घेतल्यानंतरही "आम्हालाच आधी खाद्यपदार्थ मिळावा" यासाठी नागरिकांमध्ये चढाओढ पाहायला मिळाली. दीर्घकाळ अडकून पडलेल्या प्रवाशांच्या चेहऱ्यावर थकवा, अस्वस्थता आणि नाराजी स्पष्टपणे जाणवत होती.ही घटना केवळ अपघातापुरती मर्यादित न राहता, महामार्गावरील आपत्कालीन व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या मूलभूत सोयीसुविधांवरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील वाहतूक कोंडी अद्याप सुटलेली नाही. गॅस टँकर उलटल्यामुळे निर्माण झालेली ही स्थिती २४ तासांपेक्षा जास्त काळ चालू आहे. गेल्या २४ तासांत घडलेल्या घडामोडींमध्ये कोणताही पूर्ण तोडगा निघालेला नाही.

### ५ महत्त्वाचे अपडेट्स

- **अदोशी बोगद्याजवळ गॅस टँकर उलटला :** खंडाळा घाटात ज्वलनशील प्रोपिलीन गॅस घेऊन जाणारा टँकर उलटल्यामुळे मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर २४ तासांपेक्षा जास्त काळ वाहतूक ठप्प झाली. प्रवाशांना अन्न, पाणी आणि शौचालयाच्या सुविधा न मिळाल्याने त्रास झाला.
- **प्रवाशांना तासन् तास त्रास :** रात्रीभर वाहतूक कोंडीमुळे हजारो प्रवासी अडकले, ज्यात महिला आणि मुलांचा समावेश आहे. एक्सप्रेसवे 'पार्किंग लॉट' सारखा झाला असल्याचे प्रवाशांनी सांगितले.
- **जुन्या महामार्गावर ट्रॅफिक वळवली :** एक्सप्रेसवेवरील सर्व वाहने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर वळवण्यात आली, परंतु तेथेही ओव्हरलोडमुळे कोंडी कायम आहे. घाटातील वाहतूक अजूनही ठप्प आहे.
- **22 तास उलटूनही विस्कळीत वाहतूक :** सकाळीही मुंबई-पुणे एक्सप्रेसवे पूर्णपणे बंद आहे, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.
- **पर्यायी मार्गांचा सल्ला :** अधिकाऱ्यांनी ताम्हिणी घाट किंवा माळशेज घाटासारखे पयार्यी मार्ग वापरण्याचा सल्ला दिला आहे, कारण 50 किमी लांब कोंडीमुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प आहे.




## वाहतूक कोंडीत अडकलेल्या प्रवाशांना पुणे ग्रामीण पोलिसांची मदत

■मुंबई। प्रतिनिधी,

मंगळवारी (दि.३) सायंकाळी सुमारे ५ वाजता मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर रसायनयुक्त गॅसने भरलेला टँकर उलटला आणि त्यातून वायू गळती सुरू झाली. या घटनेनंतर एक्सप्रेसवेवर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. त्यामुळे अनेक प्रवाशांना पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहांसाठी अडचणींचा सामना करावा लागला. या परिस्थितीची दखल घेत गेल्या १८ तासांपासून एक्सप्रेसवेवर अडकून पडलेल्या हजारो प्रवाशांसाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी मदतीची मोहीम सुरू केली आहे. सध्या पोलिसांकडून मदत केल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

**पिण्याच्या पाण्याची आणि स्वच्छतागृहांची समस्या**


माहितीनुसार, बुधवारी अनेक प्रवाशांनी "२४ तासांपासून एकाच ठिकाणी अडकलो आहोत" अशी तक्रार केली. वाढत्या उन्हामुळे पिण्याच्या पाण्याची आणि स्वच्छतागृहांची समस्या निर्माण झाली आहे. मुंबईतील रुग्णालयांकडे जाणारे रुग्ण, कॅन्सर रुग्ण तसेच दूरवरून आलेल्या प्रवाशांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

**एकेरी वाहतूक सुरू**

दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना एक्सप्रेसवे टाळून ताम्हिणी घाट किंवा माळशेज घाट मार्गाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. काही काळासाठी एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली असली, तरी वाहनांची संख्या जास्त असल्याने संपूर्ण मार्ग सुरळीत होण्यासाठी अजून वेळ लागणार आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### पुणे ग्रामीण पोलिसांची मदत

पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली लोणावळा शहर पोलिस एक्स्प्रेसवेवर अडकलेल्या प्रवाशांना पाणी व अन्नाचे वाटप करत आहेत. व्हिडीओंमध्ये पोलिस कर्मचारी दुचाकींवरून वाहनांच्या रांगेत फिरत पाण्याच्या बाटल्या आणि बिस्किटांचे पाकीट देताना दिसत आहेत. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना प्राधान्य देऊन मदत केली जात आहे. एसपी संदीपसिंग गिल यांनी सांगितले की, ₹परिस्थिती पूर्णपणे सुधारत नाही तोपर्यंत पोलिसांची मदत सुरूच राहील.₹ माहितीनुसार, अपघातानंतर सुरक्षेच्या कारणामुळे संपूर्ण वाहतूक थांबवण्यात आली होती. रात्रभर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलच्या पथकाने गळती थांबवण्याचे आणि टँकर हटवण्याचे काम केले. मात्र, वाहनांची संख्या जास्त असल्याने वाहतूक अद्याप पूर्णपणे सुरळीत होऊ शकलेली नाही.



### वाहनांच्या रांगा

पुण्याकडे जाणारी वाहतूक खोपोली-खालापूर टोलनाक्यापर्यंत अडकली असून मुंबईकडे जाणारी वाहतूकीसाठी १० ते १२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांब रांगा रस्त्यावर पाहायला मिळत आहेत.

### पोलिसांचे आवाहन

खोपोली पोलिसांनी सांगितले की, "प्रोपिलीन वायूचा टँकर उलटल्यामुळे गळती सुरू झाली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सर्व आपत्कालीन यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत आहेत. लोकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक रोखण्यात आली असून वाहनांना पयार्यी मार्गांवर वळवले जात आहे."

### सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रवाशांचा संताप

सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रवाशांकडून वाहतूक कोंडीबाबत रोष व्यक्त केला जात आहे. तसेच, इतर नागरिकांनी या मार्गावरून प्रवास टाळावा, असा सल्लाही पोस्टमार्फत दिला जात आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर गॅस टँकर पलटी

## वाहतूक कोंडीने प्रवाशांचे हाल, कोणत्या मार्गाने कराल प्रवास?

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर मोठा धोका टळला आहे. मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावरील खंडाळा घाटातील आडोशी बोगद्याजवळ प्रोपिलीन वायूने भरलेला टँकर पलटी झाला. या अपघातामुळे एक्सप्रेसवेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. अपघाताला १५ तासांपेक्षा जास्त वेळ होऊनही वाहतूक पूर्णपणे सुरळीत न झाल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत. हा अपघात मंगळवारी (दि.३) सायंकाळी ५ च्या सुमारास झाला. टँकर उलटताच त्यातून वायू गळती सुरू झाली. अपघाताची माहिती मिळताच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल च्या टीमने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी टँकरचा व्हॉल्व्ह बंद करण्याचे अनेक प्रयत्न केले, मात्र सुरुवातीला त्यांना यश आले नाही. त्यानंतर भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या तज्ञ टीमला मदतीसाठी बोलावण्यात आले. या रासायनिक गळतीमुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली.



**पयार्यी मार्ग**

- ताम्हिणी घाट मार्ग : चांदणी चौक – ताम्हिणी घाट – रायगड
- माळशेज घाट मार्ग : पुणे – चाकण – नारायणगाव – आळे फाटा – माळशेज घाट – मुरबाड – कल्याण/ ठाणे – मुंबई
- भीमाशंकर / मंचर मार्ग : पुणे – मंचर – जुन्नर – माळशेज परिसर – मुंबई
- या पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांना करण्यात आले आहे.

**वाहतूक सुरळीत कधी होणार?**

अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, सध्या संथ गतीने वाहतूक सुरु असून वायूगळती पूर्णपणे थांबल्यावर आणि टँकर हटवल्यानंतरच एक्सप्रेसवेवरील वाहतूक सुरू केली जाईल. एक्सप्रेसवे स्वच्छ होईपर्यंत वाहतूक सुरळीत होऊ शकणार नाही.

# आधारभूत धान खरेदीत अपहार उघड

## सवादे केंद्रातील भात परस्पर विक्रीसाठी नेताना कारवाई

■डहाणू। प्रतिनिधी,

आदिवासी शेतकर्यांच्या हितासाठी केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येणार्या आधारभूत धान (भात) खरेदी योजनेत मोठा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या जव्हार प्रादेशिक कार्यालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या सवादे (ता. विक्रमगड) येथील आधारभूत धान खरेदी केंद्रातून खरेदी केलेल्या भाताचा थेट अपहार केल्याप्रकरणी डहाणू तालुक्यातील कासा पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हंगाम २०२४-२०२५ दरम्यान सवादे येथील शासकीय गोदामात खरेदी करण्यात आलेल्या धानाची भरडाई करण्याचा ठेका आदिवासी विकास महामंडळाने वसई (भिणार) येथील सद्गुरुकृपा राईस मिल यांना दिला होता. त्यानुसार शनिवारी सवादे येथून टेम्पो क्रमांक एम. एच. ४८ सी.क्यू. ६८३९ मध्ये ३१५ बारदाना (पोती) धान भरण्यात आल्याची नोंद करण्यात आली होती. तसेच आरोपी क्रमांक दोनच्या ताब्यातील टेम्पो क्रमांक एम.एच. ४८ सी.क्यू. १५०६ मध्ये ३२५ बारदाना धान दाखविण्यात आले होते.



या दोन्ही टेम्पोमधील धानाचे एकूण वजन सुमारे १२६ क्विंटल असून त्याची अंदाजे किंमत ५ लाख ९३ हजार रुपये इतकी असल्याचे शासकीय नोंदीत नमूद आहे. सदर धान भिणार येथील सद्गुरुकृपा राईस मिलकडे भरडाईसाठी नेत असल्याचे अधिकृत कागदपत्रांमध्ये दर्शविण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात हे दोन्ही टेम्पो वसईच्या दिशेने न जाता गुजरात राज्याच्या दिशेने जात असल्याचे काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ जव्हार येथील आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक योगेश सुदाम पाटील यांच्याकडे याबाबत तक्रार दाखल केली.

तक्रारीची गंभीर दखल घेत प्रादेशिक व्यवस्थापक पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत टेम्पो चालकांची चौकशी केली. यावेळी सादर करण्यात आलेली कागदपत्रे भिणार येथील मिलची असली, तरी एका टेम्पो चालकाने प्रत्यक्षात हा माल गुजरात राज्यात नेला जात असल्याची पावती दाखवत कबुली दिली. शासकीय नियमानुसार गोदामातून भरलेले धान थेट भरडाई केंद्रावर पोहोचणे आवश्यक असताना, ट्रक चालक व राईस मिल मालक यांनी संगनमताने धानाचा अपहार केल्याचा ठपका तक्रारीत ठेवण्यात आला आहे.

या प्रकरणामुळे शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले असून या संदर्भात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१६(३), ३१८(२), ३३६(३), ३४०(२), ३(५) तसेच अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात टेम्पो चालक अस्वद अजिजुरेहमान सिद्दीकी (वय २३) व साहिद अजिजुरेहमान सिद्दीकी (रा. मनोर, जि. पालघर) तसेच राईस मिल मालक वसंत आनंद पाटील (वय ४६, रा. विरार पश्चिम) यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. रविवारी त्यांना न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून मंगळवारी पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस उपविभागीय अधिकारी समीर मेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमर पाटील व पोलीस उपनिरीक्षक डोंगरे करीत आहेत. दरम्यान, आदिवासी शेतकर्यांच्या हितासाठी असलेल्या आधारभूत धान खरेदी योजनेतच असा गैरप्रकार घडल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे.

# २ किलो कोकेन आणि बेकायदेशीरपणे राहणाऱ्या १०९ नायजेरियन नागरिकांना अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

बेकायदेशीरपणे भारतात राहणाऱ्या परदेशी नागरिकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी बुधवारी (०४ फेब्रुवारी) सकाळी मीरा-भाईंदर आणि वसई-विरार (एमबीव्हीव्ही) पोलिसांनी नालासोपारा पूर्व भागात मोठे कोम्बिंग ऑपरेशन राबवले. नालासोपारा पूर्वेकडील अचोले आणि तुळींज भागात आज सकाळी 6 वाजता एकाच वेळी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान पोलिसांनी कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी 109 नायजेरियन नागरिकांना ताब्यात घेतले आहे. धक्कादायक म्हणजे शोध मोहिमेदरम्यान एका व्यक्तीकडून अंदाजे २ किलो कोकेन देखील जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस उपायुक्त पूर्णिमा चौगुले-श्रृंगी यांनी सांगितले की, ज्या व्यक्तीकडून मोठ्या प्रमाणात कोकेन जप्त करण्यात आले आहे, त्याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात येत आहे. तसेच आतापर्यंत ताब्यात घेतलेल्या कोणत्याही परदेशी नागरिकाने वैध प्रवास किंवा निवासी कागदपत्रे सादर केलेली नाहीत.



डीसीपी चौगुले-श्रृंगी यांनी सांगितले की, नालासोपारा आणि आसपासच्या भागात नायजेरिया, युगांडा, घाना आणि इतर देशांतील परदेशी नागरिक ड्रग्ज तस्करीत सहभागी असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या. तसेच यापैकी काही व्यक्ती बेकायदेशीर व्यवसाय करत होते आणि याबाबत वसई-विरार महानगरपालिकेला माहिती होती. याच पार्श्वभूमीवर ड्रग्ज तस्करी आणि बेकायदेशीर आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. ताब्यात घेतलेल्या सर्वांना त्यांचे प्रवास आणि निवास कागदपत्रे सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. जे नागरिक वैध कागदपत्रे सादर करू शकतात, त्यांना स्थापित नियमांमध्ये राहण्याची परवानगी दिली जाईल. तसेच जे नागरिक वैध कागदपत्रे सादर करू शकणार नाहीत, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. कमी भाडेपट्ट्यांमुळे परदेशी नागरिक या भागांना प्राधान्य देत असल्याचे पोलिसांचे मत आहे.

पोलिसांचे म्हणणे आहे की, नालासोपारा आणि आसपासचा परिसर हळूहळू ड्रग्ज तस्करीचे केंद्र बनत आहे. काही दिवसांपूर्वीच मीरा-भाईंदर आणि वसई-विरारचे पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी पत्रकार परिषदेत खुलासा केला होता की, त्यांच्या पथकाने अंदाजे १२,००० कोटी किमतीचे ड्रग्ज जप्त करताना १२ आरोपींना अटक केली होती. तसेच यापूर्वी, नालासोपारा येथे एक ड्रग्ज फॅक्टरी सापडल्याप्रकरणी या परिसरातील वरिष्ठ निरीक्षकाला निलंबित करण्यात आले होते.

### दिल्ली प्रमाणे सोपाऱ्यात पोलिसांची कारवाई

पोलीस सूत्रांनुसार, आज नालासोपाऱ्यात झालेली कारवाई ही काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय राजधानी दिल्लीत झालेल्या कारवाईसारखीच आहे. ड्रग्ज तस्करी आणि बेकायदेशीर परदेशी नागरिकांविरुद्धची कारवाई 'ऑपरेशन क्लीन स्वीप'चा भाग आहे. दिल्ली पोलिसांनी आफ्रिकन देशातील २६० व्यक्तींना ताब्यात घेतले होते. संयुक्त पोलीस आयुक्त जतिन नरवाल यांनी त्यावेळी सांगितले होते की, ड्रग्ज नेटवर्क नष्ट करण्यासाठी आणि कालबाह्य व्हिसासह किंवा कागदपत्रे नसलेल्या परदेशी नागरिकांवर कारवाई करण्यासाठी ही कारवाई सुरू करण्यात आली होती. घरमालक योग्य पडताळणीशिवाय परदेशी नागरिकांना घरे भाड्याने देत असल्याच्या वारंवार तक्रारी आल्यानंतर दिल्ली पोलिसांनी ही कारवाई केली होती.

# महाराष्ट्रातील नवजात बाळाला गुजरातमध्ये लाखोंना विकण्याचा प्रयत्न... आईसह पाच आरोपींना अटक

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात जन्मलेल्या १० दिवसांच्या बाळाला गुजरातमधील सुरतमध्ये २ ते २.५ लाख रुपयांना विकण्याचा कट रचल्याचा एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. सुरत पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून नवजात बाळाची १८ वर्षीय आई, तिचा भाऊ आणि काकूसह पाच आरोपींना अटक केली आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, कुटुंबाच्या प्रतिष्ठेचे कारण देत नवजात बाळाला महाराष्ट्रातून सुरत येथे आणण्यात आले होते आणि तिथे विकण्याचा प्रयत्न केला जात होता.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरतमधील चौक बाजार पोलीस ठाण्यात नवजात बाळाच्या विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौक बाजार पोलिसांनी नवजात पोलिसांची आई, तिचा २३ वर्षीय भाऊ दीपक भोटकर आणि त्यांची ४७ वर्षीय काकू अनिता गणेशेश्वर भोटकर या तिघांसह अंजली मिश्रा (३३) आणि लक्ष्मी सोनवणे (४४) या दोन महिलांना अटक केली आहे. अंजली मिश्रा आणि लक्ष्मी सोनवणे यांच्या फ्लॅटमध्ये विक्री करण्यासाठी आणलेले नवजात बाळ सापडले होते.




चौक बाजार पोलीस निरीक्षक एन.जी. चौधरी यांनी माध्यमांना सांगितले की, लक्ष्मी सोनवणे आणि अंजली मिश्रा यांनी नवजात बाळाला २ ते २.५ लाख रुपयांना विकण्याची ऑफर देणारा मॅसेज विविध लोकांना पाठवला होता. परंतु नवजात बाळाला विक्रीसाठी सुरतला आणल्याची माहिती आम्हाला मिळाली. त्यानंतर गेल्या महिन्यात सुरत गुन्हे शाखेने वेड रोडवरील एका फ्लॅटवर छापा टाकला. त्याठिकाणी नवजात बाळ आढळून आले, परंतु दोन्ही महिला नवजात बाळाबाबत कोणतेही समाधानकारक उत्तर किंवा कागदपत्रे देऊ शकले नाही. तसेच चौकशीदरम्यान दोन्ही महिलांनी बाळाची विक्री करण्याचा आणि विक्रीसाठी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, नवजात बाळाची आई महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे तिच्या मावशीच्या घरी राहत होती. त्याच ठिकाणी तिचे एका तरुणाशी प्रेमसंबंध होते आणि ती गर्भवती राहिली. यानंतर तरुणीने तिच्या मावशीच्या घरी एका बाळाला जन्म दिला. कुटुंबातील बदनामीच्या भीतीने काकूने तिची मैत्रिणी लक्ष्मी सोनवणेशी संपर्क साधला आणि तिला नवजात बाळाची जबाबदारी घेण्यास सांगितले. त्यानंतर लक्ष्मी सोनवणे आणि तिची जोडीदार अंजली मिश्रा यांनी छत्रपती संभाजीनगरला जाऊन नवजात बाळाला सुरतला नेले.

दोन्ही महिलांच्या कबुलीनंतर ३० जानेवारी रोजी त्यांना भारतीय दंड संहितेच्या कलम १४३(१) आणि १४३(४) अंतर्गत अटक करण्यात आली. दोन्ही महिलांच्या माहितीनंतर पोलीस पथक छत्रपती संभाजीनगरला पोहोचले आणि नवजात मुलीची आई, भाऊ आणि काकू यांना ताब्यात घेतले. या प्रकरणात संघटित टोळीची भूमिका नाकारता येत नाही, असे निरीक्षक चौधरी यांनी माध्यमांना सांगितले. तसेच आरोपींनी यापूर्वी नवजात बाळांच्या तस्करीत सहभाग घेतला आहे का? याचाही तपास पोलीस करत आहेत.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# देश बलशाली होऊ शकतो!



लोकसभा आणि राज्यसभा या सर्वोच्च व्यासपिठांवर केवळ राजकीय मतभेद असून उपयोग नाही, तर तेथे राष्ट्रहिताशी निगडित गंभीर अन् महत्त्वपूर्ण प्रश्नांवर सुसंस्कृत, तसेच नियमबद्ध पद्धतीने चर्चा व्हायला हवी. तसे झाल्यासच या महत्त्वपूर्ण व्यासपिठांचा सन्मान राखला जाऊ शकतो. लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील 'आभार प्रस्तावा'च्या चर्चेच्या वेळी नुकताच घडलेला प्रकार पहाता या विषयावर विचारविनिमय करणे आवश्यक ठरते. २ फेब्रुवारी या दिवशी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा करणे अपेक्षित होते; पण विरोधी पक्षनेते काँग्रेसचे राहुल गांधी यांनी अभिभाषणातील सूत्रांवर भाष्य न करता थेट भारत-चीन सीमेवरील सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी 'डोकलाम परिसरात चीनच्या सैन्याने भारतीय हद्दीत घुसखोरी केली', असे म्हटले आणि त्यासाठी निवृत्त सैन्यदलप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित असलेल्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या आत्मचरित्राचा संदर्भ दिला. हेच निमित्त ठरले आणि सभागृहात गदारोळ झाला. सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला. संसदेच्या नियमांचा दाखला देत अशा प्रकारे अप्रकाशित पुस्तकाचा संदर्भ देणे अयोग्य असल्याचे सांगितले. परिणामी कामकाज संपूर्ण दिवसासाठी स्थगित करावे लागले. वारंवार गदारोळामुळे कामकाज स्थगित केल्याने हानी कुणाची होते? तर देश आणि जनता यांची! यातून 'केवळ वादविवाद आणि गोंधळाचे व्यासपीठ' अशी संसदेची प्रतिमा निर्माण होऊ लागली आहे, हे चिंताजनक आहे. खरेतर संसदेचा वेळ घालवणार्यांच्या राजकीय पक्षाकडूनच त्या दिवशीच्या खचार्ची हानीभरपाई व्याजासह वसूल करायला हवी. त्यातून जनतेच्या कष्टाचे पैसे वाचतील आणि बेताल वक्तव्ये करणार्या लोकप्रतिनिधींनाही वेसण बसेल! लोकशाहीत विरोधी पक्षाला प्रश्न विचारणे, सरकारला खडसवणे आणि राष्ट्रीय सुरक्षेसारख्या संवेदनशील विषयांवर स्पष्टीकरण मागणे यांचा पूर्ण अधिकार आहे. या पार्श्वभूमीवर भारत-चीन सीमेवरील परिस्थिती ही देशाच्या सार्वभौमत्वाशी निगडित असल्याने त्यावर संसदेत चर्चा होणारच. राहुल गांधी यांचे सूत्र गंभीर निश्चितच आहे; कारण जर खरोखर घुसखोरी झाली असेल, तर सरकारने संसदेसमोर स्पष्ट भूमिका मांडणे अत्यावश्यक ठरते; पण सूत्र मांडण्याची वेळ, पद्धत आणि संदर्भ हे संसदीय नियमांच्या चौकटीत होते का? याचा त्यांनी विचार करायला हवा. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चचेर्चा विशिष्ट उद्देश असतांना ती चर्चा राहिली दूरच; पण राहुल गांधी यांनी विषयांतर नव्हे नव्हे, तर विषयाची घुसखोरी करून काय साध्य केले? हे संसदीय परंपरेच्या दृष्टीने अयोग्यच ठरले. त्यात भर-ीस भर म्हणून त्यांनी स्वतःच्या विधानाला निवृत्त सैन्यदलप्रमुख मनोज नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील संदर्भ जोडून सूत्रे मांडली. खरेतर 'हे पुस्तक अप्रकाशित आहे आणि अधिकृतरित्या उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे त्याचा संदर्भ देणे, हे नियमबाह्य आहे', अशी जाणीव लोकसभा अध्यक्षांना राहुल गांधी यांना करून द्यावी लागली आणि त्यांना खाली बसवावे लागले. 'नरवणे यांचे पुस्तक अद्याप प्रकाशित झालेले नाही; पण त्यामागेही काही कारणे असू शकतात', असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनाही सांगावे लागले. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनीही सांगितले, 'पुस्तक प्रकाशित झाले असले किंवा नसले, तरी संसदेच्या नियमानुसार त्यावर येथे चर्चा केली जाऊ शकत नाही. सदनाची मयार्दा ओलांडू नका'; पण तरीही राहुल गांधी तीच सूत्रे मांडत होते. यातून पुन्हा एकदा त्यांचा बालिशपणा दिसून आला. खरेतर संसदेचा अवमान केल्याप्रकरणी त्यांच्यावर कारवाईच व्हायला हवी. येथे एक प्रश्न पडतो की, जे पुस्तक प्रकाशितच झालेले नाही, तर त्यात काय लिहिले आहे, हे राहुल गांधी यांना कळले तरी कसे? याचे उत्तर त्यांनी नागरिकांना द्यायला हवे. राहुल गांधी 'आपण हुशार आहोत', हे दाखवत आहेत; पण यातून त्यांचेच पितळ उघडे पडत आहे, हे त्यांच्या लक्षात येत नाही. आज राहुल गांधी बोलले, उद्या कुणीही 'अप्रकाशित झालेली', 'अन्य स्रोतांकडून उपलब्ध झालेली' किंवा 'अधिकृत; पण गोपनीय' अशा स्वरूपातील माहिती वाचून दाखवू शकतो. मग संसदरूपी व्यासपिठाला काही अर्थच उरणार नाही. अशाने संसद हे 'अफवांचे व्यासपीठ' होईल. संसद हे संघर्ष, मतभेद किंवा वादविवाद यांचे ठिकाण नव्हे. ते संवादाचे व्यासपीठ असायला हवे. संवाद झाल्यासच लोकशाही बळकट होऊ शकते; पण ते काँग्रेसींना कुठे जमते ? राष्ट्रिहत, राष्ट्रीय सुरक्षा, संसदीय शिस्त आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्य यांचे संतुलन राखायला हवे. लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात शिस्त पाळायला हवी. लोकप्रतिनिधींनी संयम आणि संवाद यांचे महत्त्व लक्षात घेऊन वर्तन करावे. वर्ष १९६२ च्या युद्धात चीनने भारताची ३८ स-हस्र चौरस किलोमीटर भूमी बळकावली. यावर राहुल गांधी यांचे पणजोबा आणि तत्कालीन पंतप्रधान नेहरू यांनी संसदेत 'जेथे गवताची पातीही उगवत नाहीत, अशीच भूमी चीनने बळकावली आहे', असे म्हणत याचे समर्थन केले होते. नेहरूंच्या आत्मघाती 'हिंदी-चिनी भाई भाई'च्या धोरणामुळे ही भूमी चीनने हिसकावली. तेव्हा सैन्याचे आधुनिकीकरण झाले नसल्याने सैनिकही युद्धसज्ज नव्हते. त्यामुळे युद्धाचे भीषण दुष्परिणाम भारताला भोगावे लागले आणि भारत ते अजूनही भोगत आहे. काश्मीर प्रश्न न सोडवता नेहरूंनी तो संयुक्त राष्ट्रात नेला आणि युद्धविराम स्वीकारला; पण त्यामुळे झाले काय? तर आजतागायत पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानकडेच राहिला आणि आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपांना वा-रंवार सामोरे जावे लागले. देशहितापेक्षा आंतरराष्ट्रीय प्रतिमेला जपल्याने ते घातक ठरले. या चुकांमुळे देश अनेक दशके मागे गेला. काँग्रेसला भारताची घालवलेली भूमी अनेक दशकांनंतरही मिळवता आलेली नाही, याविषयी राहुल गांधी काहीच बोलत नाहीत. भारत कुठे आणि कसा चुकला, याविषयी अनेक जाणकारांनी पुस्तके लिहिली आहेत; पण राहुल गांधी त्यांचा संदर्भ चुकूनही देणार नाहीत; कारण त्यांना ठाऊक आहे की, तसे केले, तर ते प्रकरण आपल्यावरच शेकणार आहे. 'भारत-चीन संबंध आधीच तणावपूर्ण असतांना त्याविषयीचा उल्लेख संसदेत केल्याने वैश्विक स्तरावर भारताविषयी चुकीचा संदेश जाऊ शकतो', हा विचार राहुल गांधी करत नाहीत; कारण त्यांना दायित्वाचे भानच नाही. राष्ट्रीय सुरक्षेवर चर्चा निश्चितच हवी; पण ती नियमबाह्य झाल्यास देशासाठी धोकादायक ठरू शकते. राष्ट्राच्या सार्वभौमत्वाशी निगडित निर्णय घेणाऱ्या संसदीय परंपरेला शोभणारे वर्तनच लोकप्रतिनिधींनी केल्यास ते देशहिताला पूरक ठरेल. लोकशाहीचा गाभा ढासळू न दिल्यास यातूनच लोक-शाही संस्थांची विश्वासार्हता वाढून देश बलशाली होऊ शकतो!

# नव्या नियमावलीची भीती कुणाला?




**यूजीसीच्या नव्या नियमावलीमुळे उच्च शिक्षणात समानतेसाठी महत्त्वाची पायरी उभारली जात आहे, तरी सर्वसाधारण वर्गात याबद्दल संभ्रम आणि वादळ निर्माण झाले आहे.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन - यूजीसी) अलीकडेच लागू केलेल्या नियमांना मागच्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने (यापुढे खंडपीठाने) स्थगिती दिली आ-हे. सर्वसाधारण वर्गातील विद्यार्थ्यांवर या नियमांमुळे अन्याय होतोय या कारणास्तव दाखल प्रकरणी न्यायालयाने तडकाफडकी हा निर्णय दिला. हे नियम संदिग्ध असून त्यातील तरतुदींचा गैरवापर होण्याची दाट शक्यता दिसते असं म्हणत खंडपीठाने स्थगितीचा निर्णय दिला. यातील घटनाक्रमांचा वेग चक्रावून टाकणारा आहे!

'प्रमोशन ऑफ इक्विटी इन हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूट २०२६' ही नियमावली यूजीसीने १३ जानेवारीपासून लागू केली. त्या विरुद्ध उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी लगोलग आंदोलन पेटले. नियमावलीच्या विरोधकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली व पहिल्याच सुनावणीत स्थगितीचा आदेश मिळवला. नियमावली लागू झाल्यापासून हे सारे अवघ्या २ आठवड्यांत झाले! सर्वसाधारणपणे सरकारी, निमसरकारी व सरकार पुरस्कृत संस्था वा विभागांनी एखादी बाब लागू केली, तर न्यायालय प्राथमिकतः सुरुवातीपासूनच अशा प्रस्तावांच्या बाजूने राहून, प्रकरणाचा विचार करते. त्यामुळे यूजीसीसारख्या शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील स्वायत्त संस्थेने बनवलेले नियम, न्यायालयाने एका फटक्यात तकलादू असल्याचे घोषित करणे, आश्चर्यकारक व संशयास्पदही वाटते आहे. खंडपीठाने केवळ स्थगिती दिली आहे. नियम रद्द केलेले नाहीत. त्यावर पुढे सुनावणी बाकी आहे. त्यामुळे १५-१६ दिवसांतल्या या घडामोडींपाठी अजून काही शिजायला घातलंय का, हे तपासणं आवश्यक आहे.

नियमावलीच्या नावात तिचा उद्देश स्पष्ट होतो. उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये सर्वांना समानतेची वागणूक मिळण्यास प्रोत्साहन देणारी ही नियमावली आहे. बरे यूजीसीने ही नियमावली अचानकरीत्या आणलेली नाही. देशातील एकूणच जातीय विषमता व वैरभाव आणि गेल्या ६-७ वर्षांतील या संदर्भात विमनस्क करणाऱ्या घडामोडी यापाठी आहेत. रोहित वेमुला, पायल तडवी आदी पदव्युत्तर पदवी व पीएचडी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जाती- आधारित भेदभावामुळे वसतिगृहातच आत्महत्या कराव्या लागल्या होत्या. या विद्यार्थ्यांच्या पालकांनी २०१९ मध्ये दाखल केलेल्या जनहित याचिकांनंतर दस्तुरखुद्द सर्वोच्च न्यायालयानेच यूजीसीला, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संरक्षणाची हमी देणारे नियम बनवण्याचा आदेश दिला होता. (ही केस अद्याप सुरू आहे) त्यामुळेच या नियमावलीच्या अंतर्गत, महाविद्यालयात व विद्यापीठांमध्ये जाती-आधारित भेदभाव रोखण्यासाठी विशेष समित्या, हेल्पलाइन व देखरेख पथके स्थापण्याचे निर्देश दिलेले होते. त्याप्रमाणे ५-६ वर्षांनंतर ही नियमावली अवतरली. काँग्रेसप्रणीत विद्यार्थी संघटनांनी याचे स्वागत केले, तर भाजपप्रणीत अभाविपने, ह्यनव्या नियमांना आमची हरकत नाही. मात्र याबाबत आमच्या काही शंका आहेत,' अशी सावध भूमिका घेतलीये. पिढ्यानपिढ्या जातीभेदाचा सामना, अपमान, छळ व मानसिक खच्चीकरण अनुभवणाऱ्या दलित, मागासवर्गीय व ओबीसी विद्यार्थ्यांना हे नियम आवश्यक सुरक्षा कवच पुरवणारे आहेत, असा समर्थकांचा दावा आहे. विरोधक मात्र सर्वसाधारण विद्यार्थ्यांना गैरसोयीचे, अन्यायकारक, शैक्षणिक स्वायत्तताविरोधी व संस्थात्मक दडपशाहीला वाव देणारे असल्याची टीका करतात. नियमावलीतील ३(क) हे कलम जाती-आधारित भेदभाव म्हणजे काय ही व्याख्या विदित करते. त्यानुसार, फक्त अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीयांबाबतीत जात वा जमातीच्या आधारे केला जाणारा भेदभाव हा निषेधार्ह मानण्यात आला आहे. खरे तर हे संविधानातील तरतुदींना सुसंगतच आहे. न्यायालयात या विरुद्ध दावा दाखल करणाऱ्यांचं प्रतिपादन आहे की, या व्याख्येतून सर्वसाधारण वर्गाला वगळण्यामुळे आम्हाला त्रास वा जाच (हॅरॅसमेंट) सहन करावा लागेल. शिवाय सर्वसाधारण वर्गावर जर खोट्या केसेस दाखल झाल्या, तर त्याच्या निराकरणाची नियमावलीत काहीच तरतूद नाही!

नव्या नियमावलीतील मार्गदर्शक सूचना यापूर्वीही होत्या, पण अनेक शिक्षण संस्थांमध्ये त्यांची अंमलबजावणी होत नसे. त्यामुळेच यूजीसीने अधिक स्पष्ट शब्दांत, थोडी कठोर उपाय सुचविणारी व संबंधितांची जबाबदारी निश्चित करणारी नियामक चौकट बनवली.

मात्र प्रामुख्याने ती सल्ला या स्वरूपात तयार केली आहे. संविधानात सांगितलेला जाती आधारित भेदभाव रोखणे व सर्वांसाठी शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे हीच उद्दिष्ट्ये नव्या नियमावलीतून साधण्याचा प्रयत्न आहे. या नियमांनुसार देशातील प्रत्येक विद्यापीठ व महाविद्यालयात समान संधी केंद्र स्थापण्याची अनिवार्यता असेल. भेदभावविरोधी धोरणांची अंमलबजावणी, या संदर्भात जनजागरण-प्रबोधन व तक्रार निवारणाचे काम प्रामुख्याने करेल. विशेषतः दलित मागासवर्गीय ओबीसींसाठी स्वतंत्र व प्रभावी यंत्रणा उभारण्याच्या व त्या पारदर्शकरीत्या अंमलात आणाव्यात, असे स्पष्ट निर्देश यात दिलेले आहेत.

उच्च शिक्षणासंदर्भात यातील महत्त्वाची सुधारणा म्हणजे संस्थात्मक जबाबदाऱ्यांबाबत सुस्पष्टता. जे कुणी अशा तक्रारींकडे दुर्लक्ष करतील ते अगदी कुलगुरू वा प्राचार्य पद-ावर असले तरी कठोर प्रशासकीय कारवाईची तरतूद आहे. संस्थांची यूजीसी मान्यता रद्द करण्यापर्यंतची तरतूद यात आहे.

खरं तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा असा छळ होऊ नये असं मानणाऱ्यांना वा तसा छळ न करणाऱ्यांना नियमांची भीती का वाटावी? कर नाही त्याला डर कशाला? पण वस्तुस्थिती नेमकी विपरीत आहे. देशातील अनेक सुप्रसिद्ध दर्जेदार शिक्षणसंस्थांमधून दलित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विविधप्रकारे होणाऱ्या अन्याय, अत्याचार व छळाच्या तक्रारी वारंवार कानावर येत आहेत. वसतिगृहात दुजाभाव, प्राध्यापकांकडून दबाव वा मानसिक छळ, परीक्षा मूल्यमापनात हेराफेरी, संशोधन प्रकल्पात अडचणी निर्माण करणे... एक ना अनेक प्रकारे त्रास देणे नित्याचे झाले आहे. विद्यार्थी आत्महत्या वा तत्सम गंभीर प्रकरण घडले तरी संस्था याबाबत अत्याचाऱ्यांवर शासन करण्यात अनेकदा पुढाकार तर घेत नाहीतच उलट तक्रारी आल्यावरही टाळाटाळ करतात! याबाबत देशभरात कडक टीका होत होती. एकापरीने ही नियमावली म्हणजे शिक्षणसंस्थांच्या निष्क्रियतेला चाप बसवण्याचा प्रयत्न आहे.

यूजीसी नियमावलीच्या विरोधात लखनऊ, रायबरेली, वाराणसी, मेरठ, प्रयागराज, अमेठी, सीतापूर या उत्तर प्रदेशातील गायपट्ट्यात विद्यार्थी, युवक व विविध जहाल संघटना रस्त्यावर आल्या. करणी सेना या राखीव जागा विरोधी उग्र संघटनेने यात पु-ढाकार घेतला. भाजप व गोरक्षण दलाने उच्च जातीच्या खासदारांना बांगड्या पाठवल्या. बरेलीतील शहर दंडाधिकाऱ्याने यूजीसीची नियमावली न पटल्याने पदाचा राजीनामा देत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. थोडक्यात, या सुधारणा लागू झाल्याचे जाहीर होताच एखादी पूर्वतयारी असावी अशा वेगाने आंदोलनाचं लोण पसरवण्यात आलं. यूजीसीने नवा ॲट्रॉसिटी कायदा लागू केलाय, नवे नियम पूर्णतः सर्वसाधारण वर्गातील विद्यार्थ्यांच्या विरोधात आहेत अशा अफवा पसरवण्यात आल्या. खरं तर हे नियम म्हणजे का-ही गुन्हेगारी दंडसंहिता नाही. यांच्या आधारे आपोआप पोलीस कारवाई केली जाऊ शकत नाही. प्रत्यक्षात ही केवळ एक संस्थात्मक तक्रार निवारण, प्रतिबंधात्मक उपाययोजना व प्रशासकीय उत्तरदायित्व नक्की करणारी यंत्रणा आहे.

नेमके उत्तर प्रदेशात येऊ घातलेल्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या आधी वातावरण सांप्रदायिक मुद्द्यांवर पेटवून देण्याचा डावच यात अधिक असावा अशा शंकेस वाव आहे! उच्च शिक्षणात प्रामुख्याने देशातील शिक्षित, हुशार, कष्टाळू, संवेदनशील व जिद्दी युवावर्ग सहभागी असतो. ते क्षेत्र क्ष-ुद्र राजकारणासाठी भडकावले जात असेल तर ते देशाच्या भवितव्यासाठी नुकसानीचे ठरेल. युवापिढीला संकुचितवादात अडकवून वैर, द्वेष व हिंसा पसरवण्यासाठी वापरले जाईल. त्यामुळे या प्रश्नावर घातक व भडक-ावू राजकारणास लगाम लावत दलित आदिवासी ओबीसी विद्यार्थ्यांच्या रास्त योगदानास न्याय देण्याची भूमिका पसरणे व त्यावर अंमल होणे गरजेचे आहे.



# जगण्याचा ऑनलाइन धोका!

**आजच्या समाजात तरुणांच्या चर्चा जास्त करून पैशावर केंद्रित झालेल्या दिसतात; मोबाईल आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाइन फसवणूक मोठ्या प्रमाणावर वाढल्याने आर्थिक आणि मानसिक अस्वस्थता निर्माण होत आहे.**

ज्यावेळी एखाद्या समाजाची गरज केवळ 'पैसा' हीच असते, तेव्हा तो समाज फारसा प्रगल्भ झाला आहे, असे आपल्याला म्हणता येत नाही. कारण माणसाला विचारशक्ती असते, नवकल्पना, नावीन्यता आणि जगण्यातील सौंदर्य सुदृढ समाजासाठी गरजेचे असते, परंतु तरुणांच्या कट्ट्यावर बोलण्यात जगण्यातील प्रश्नांपेक्षा पैसा कमावण्याचे विषय जास्त चर्चिले जातात, तेव्हा त्यांच्या भवितव्याविषयी चिंता वाटू लागते. माणसाचे विचार त्यांनी स्वतः निर्माण केलेले नसतात, तर त्यांना कोणीतरी तसे विचार करण्यासाठी भाग पाडत असते.

त्यातून 'कसाही कमवा पण पैसा कमवा' अशी नवी 'मार्केट व्हॅल्यू' निर्माण केली जात असते. चित्रपटांमधून दाखविले जाणारे श्रीमंतीचे दर्शन आणि त्यासाठी केले जाणारे फसवणुकीचे समर्थन तरुणांना जीवन जगण्याचे नवे तत्त्वज्ञान सांगत असते. त्यामुळे मध्यम शहरांमध्ये राहणारा तरुणसुद्धा पैसे कमावण्याचे विविध मार्ग शोधत असतो. नीती आणि अनीतीचे नियम भांडवली व्यवस्थेला लागू पडत नाहीत. ही व्यवस्था आपल्या समर्थनार्थ समाजमन निर्माण करीत असते. जगण्यासाठी आवश्यक असणारा पैसा कोणत्याही माध्यमातून यावा, असे नवे तत्त्वज्ञान या व्यवस्थेने निर्माण केले आहे. त्यातच हातात आलेल्या मोबाईल आणि त्यातील विविध अप्लिकेशन्सचा वापर करून सहजपणे दुसऱ्याची फसवणूक करता येते आणि फसवणूक केल्यानंतर पकडले जाण्याची ही कोणतीही शक्यता नसते. त्यामुळे हा मार्ग अनेकांना सहज आणि सोपा वाटू लागतो. पण त्यासाठी हवे असते तांत्रिक ज्ञान. तांत्रिक ज्ञान वापरून दुसऱ्यांना फसवणूक करता येणे सहज शक्य आहे, हे लक्षात आल्यानंतर दुसऱ्यांच्या भावनांचा विचार न करता सहजपणे फसवणूक केली जाते.

सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आपणा सर्वांच्या हातात आली आहे, पण खरोखर त्यामुळे मानवाचे जीवन समृद्ध बनणार आहे का, हा खरा प्रश्न आहे. निदान भारतासारख्या देशांमध्ये तरी यामुळे सामान्य माणसाच्या जीवनात बदल होतील असे म्हणता येत नाही. उलट मोबाईलच्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे आर्थिक घोटाळे आणि लुटीचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. मोबाईल आणि त्यातील विविध अप्लिकेशनचे तंत्रज्ञान वापरणारी मंडळी शिक्षित आहेत. त्यापैकी काही तर उच्चशिक्षित तंत्रज्ञ आहेत. पण या ज्ञानी माणसाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून लोकांना गंडवण्यास आणि आर्थिक लुटीचे साधन बनवले आहे, ही मात्र गंभीर स्थिती आहे. प्रसिद्ध लेखक उदय नारकर यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे, 'आपण आपल्या कृतीनुसार विचार करत असतो. मनुष्याचं असणं तसंच आहे. काहीही न करता माणूस विचार करू शकत नाही. आपले विचार काळसूत्रात गुंफलेले दिसतात, याचं कारण आपलं शरीर आणि संवेदनादेखील तशाच काळसूत्रात गुंफलेल्या असतात. यंत्र विचार करू शकतील का, असा प्रश्न तत्त्वज्ञांना कधी कधी पडतो. कदाचित ती करूही शकतील; पण त्यांची विचार करण्याची पद्धत आपल्यापेक्षा खासच वेगळी असणार. याचं कारण यंत्राची भौतिक रचना आपल्याहून सर्वस्वी भिन्न असते. त्याला शारीरिक गरजा नसतात, भावनिक आयुष्य नसतं. यंत्राला इंधन लागतं, पण तहान लागत नाही. इंधन मिळालं नाही, तर ते निमूट बसेल. तळमळणार नाही. माणसाचं भावनिक आयुष्यदेखील त्याच्या भौतिक गरजांशी निगडित असतं. या व्यावहारिक, संवेदनांच्या आणि भावनांच्या पर्यावरणापासून आपला विचार अलग करता येत नाही. त्यामुळे यंत्रांना विचारशक्ती प्राप्त झालीच तर ते कसला विचार करतंय हे आपल्याला कळण्याची सुतराम शक्यता नाही.'

जर यंत्राला आणि कृत्रिम बुद्धिमत्तेला भावनाच नसतील आणि त्याचा वापर करणारी व्यक्ती चुकीच्या पद्धतीने वापर करत असेल तर मग याचा दोष कोणाला द्यायचा.. आपल्या वैचारिक स्वातंत्र्याला की स्क्रीनवरून बिनदिक्कतपणे बोट फिरवून दुसऱ्यांना लुबाडण्याचं स्वातंत्र्य मिळालं याला.. शेवटी हाच मुद्दा उरतो, स्वातंत्र्य आपण कसे वापरतो... समाजाच्या भल्यासाठी की दुसऱ्यांना नुकसान पोहोचविण्यासाठी. यासंदर्भात आपल्या देशाची आकडेवारी अतिशय बोलकी आहे.

२०२५ मध्ये ऑनलाइन फसवणुकीत भारतातील सुमारे रु. १९,८१२.९६ कोटींचे नुकसान झाले. यापैकी ७७% तोटा गुंतवणूक स्कॅम्समुळे झाला, ८% डिजिटल अटक, ७% क्रेडिट कार्ड फ्रॉडमुळे आणि इतर प्रकारच्या फसवणुकीमुळे बाकीचं नुकसान झालं. म्हणजेच, २०२५ मध्ये भारतात ऑनलाइन फसवणुकीमुळे सुमारे रु. १९,८०० कोटी (१९.८ हजार कोटी) इतकी रक्कम लोकांनी गमावली.

आधुनिक युगाला डिजिटल युग असे म्हणतात. इंटरनेट, स्मार्टफोन, ऑनलाइन बँकिंग, सोशल मीडिया यांमुळे आपले दैनंदिन जीवन अधिक सोपे आणि वेगवान झाले आहे, असे वाटते. मात्र या डिजिटल सुविधांबरोबरच ऑनलाइन फसवणूक ही एक मोठी सामाजिक समस्या बनली आहे. तंत्रज्ञानाचा गैरवापर करून लोकांची आर्थिक, वैयक्तिक आणि मानसिक फसवणूक केली जाते.

ही फक्त आर्थिक फसवणूक नाही, तर ती मानसिक वेदनाही आणि अस्वस्थता देते. वर्तमानाची ही अस्वस्थता भविष्यात अनेक धोके निर्माण करणार यात शंका नाही.

# बोर्डाची कॉपीमुक्त परीक्षा शक्य आहे?

**या वर्षी राज्यातील दहावी आणि बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी सरकारने सर्वतोपरी तयारी केली असून विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा आणि नैतिकता वाढवण्यावर भर दिला आहे.**

राज्यात बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून, तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहेत. प्रत्येकाच्या शैक्षणिक जीवनात या दोन्ही परीक्षा अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. नोकरीकरिता 'बायोडेटा' बनवताना त्यामध्ये दहावी आणि बारावीची टक्केवारी नमूद करण्याची प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. या परीक्षेतील टक्केवारीनुसार माणसाच्या बौद्धिक क्षमतेची कल्पना 'बायोडेटा' पाहणाऱ्याला येते. शिवाय या दोन्ही परीक्षा नेहमीच्या शाळा आणि महाविद्यालयांत न होता या परीक्षांसाठी अन्य केंद्रात जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांवर अपरिचित वातावरणात परीक्षा देण्याचा ताणही असतो. परीक्षा काळात समस्त परीक्षा केंद्रात पोलीस शिपाई नियुक्त केले जातात, कॉपी करण्याच्या प्रथेवर आळा घालण्यासाठी शासनाचे भरारी पथक कार्यरत असते. शाळेतील पर्यवेक्षकांचे विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष असते. यंदाच्या या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे सरकार राज्यभर मोहीम राबवणार आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे आदेश संबंधितांना दिले आहेत. परीक्षा केंद्रांवर नजर ठेवणासाठी ड्रोनचाही वापर केला जाणार आहे. ज्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत अशा ठिकाणी शिक्षकांची अदलाबदल करण्यात येणार आहे. या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री स्वतः जातीने लक्ष घालत आहेत. परीक्षा केंद्रात गैरप्रकार घडल्यास तत्परतेने गुन्हा नोंदवण्यात येणार आहे.

या दोन्ही परीक्षांच्या कालावधीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात कॉपी केली जाते, कॉपी करणारे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणारे त्यांचे हितचिंतक कॉपी करण्याच्या आणि कॉपी पुरवण्याच्या विविध क्लृप्त्या शोधून काढतात. दरवर्षी परीक्षाकाळात प्रतिदिन यासंदर्भातील बातम्या वाचायला मिळतात. काही ठिकाणी आपल्या शाळेचा निकाल चांगला लागावा यासाठी पर्यवेक्षक शाळेतील मुलांना पुस्तके पुरवतात. काही ठिकाणी तर बोर्डाच्या परीक्षेच्या काळात ठराविक कमिशनच्या मोबदल्यात थेट बाकापर्यंत कॉपी पुरवणाऱ्या टोळ्या सक्रिय झालेल्या पाहायला मिळतात.

या मंडळींनी पोलिसांपासून शाळेच्या पर्यवेक्षकांनाही 'मॅनेज' केलेले असते. बोर्डाच्या परीक्षेकरिता एका बाकावर एकच विद्यार्थी बसवण्याची सक्ती असताना परीक्षा केंद्रांमध्ये २ विद्यार्थ्यांना एकाच बाकावर बसवून एकमेकांच्या संगनमताने पेपर सोडवण्याची अनुमती दिली जाते. काही ठिकाणी पेपर सोडवण्याचा कालावधी संपण्याच्या काही मिनिटे अगोदर विद्यार्थ्यांना कॉपी करण्याची, एकमेकांना उत्तरे विचारण्याची अनुमती दिली जाते. काही शाळांमध्ये शाळेच्या खिडक्यांबाहेर विद्यार्थ्यांना कॉपी पुरवणाऱ्यांची जत्रा भरलेली असते. यांना पोलीसही हटकण्याची तसदी घेत नाहीत. काही विद्यार्थी तर कॉपी करण्यात अगदीच पटाईत असतात त्यांना इतका आत्मविश्वास असतो की ते परीक्षेसाठी कधीही अभ्यास न करता मिळालेला संपूर्ण वेळ कॉपी तयार करण्यामध्ये घालवतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको म्हणून काही ठिकाणी पर्यवेक्षक स्वतःच विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे सांगतात किंवा कॉपी करण्याची खुली अनुमती देतात. सरकारने यंदा ज्या पद्धतीने सिद्धता केली आहे ते पाहता यंदा कॉपी करण्यावर बऱ्याच प्रमाणात आळा बसेल, असे म्हणण्यास हरकत नाही.

मुलांचे वय हे संस्कारक्षम असते. लहान वयात होणारे संस्कारच त्यांचे भवितव्य ठरवत असतात. शालेय जीवनात परीक्षेत कॉपी करून उत्तीर्ण होण्याची सवय जडलेले महाभाग पुढील आयुष्यातही यश मिळवण्यासाठी 'शॉर्टकट'चा किंवा गैरमागार्चा अवलंब करू पाहतात. पौगंडावस्थेत असतानाच कॉपी करण्याची सवय लागल्याने भविष्यात असे करण्यात काही चुकीचे आहे असेही त्यांना कधी वाटत नाही. कॉपी केल्यामुळे आपण परीक्षा उत्तीर्ण होऊ, मात्र पुढील व्यावहारिक जीवनात परीक्षेचे प्रसंग हे पदोपदी येणार आहेत त्यावेळी आपल्या बुद्धिमत्तेची आणि विवेकाची कसोटी लागणार आहे, तेव्हा आपल्याला कोण सहाय्य करणार? कॉपी करणे म्हणजे निव्वळ आपल्या स्वाथार्साठी गैरमागार्चा अवलंब करणे.

कॉपी करणे म्हणजे ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर प्रामाणिकपणे आणि नेटाने अभ्यास केला आहे त्यांच्यावर अन्याय करणे. कॉपी करणे म्हणजे स्वतःला गुन्हेगारीची सवय लावून घेणे. कॉपी करणे म्हणजे मेहनतीला डावलून शॉर्टकट शोधण्याची सवय अंगीकारणे. वर्षभर अभ्यास करून परीक्षेला आनंदाने सामोरे जाणे ही नैतिकता आहे, तर वर्षभर उनाडक्या करून ऐन परीक्षेच्या काळात अभ्यास झाला नाही म्हणून कॉपीसारख्या गैरमागार्चा अवलंब करणे ही अनैतिकता आहे. परीक्षेचे पेपर सोडवण्यासाठी अनैतिक मागार्चा अवलंब करण्याची सवय विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात भ्रष्टाचाराने आणि गैरमागार्ने धन कमावण्याची सवय लावते.

गुन्हेगारी क्षेत्रात विद्यार्थ्यांचे आणि उच्चशिक्षितांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शाळांमध्ये नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे मध्यंतरी अनिवार्य करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास साधत असला तरी मानसिक आणि भावनिक विकासासाठी तसेच योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता येण्यासाठी शालेय जीवनात नीती आणि नैतिक मूल्ये यांचे शिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आजमितीला हा विषय शिकवण्याकरिता अनेक शाळांनी शिक्षकच नियुक्त केलेले नाहीत. बऱ्याच शाळांमध्ये या विषयाच्या तासिकेत विद्यार्थ्यांना अन्य विषय शिकवले जातात, एकूणच या विषयाला शाळांकडून दुय्यम स्थान देण्यात येत आहे. बालपणापासून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक आणि अनैतिक गोष्टींविषयी सजगता आली की मुले कॉपीसारख्या कुप्रथेच्या आहारी जाणार नाहीत.

# व्हेज खिमा रोल

**साहित्य:** सोया ग्रानुल्स- १ वाटी, कांदे- २, टोमॅटो- १, आलं-लसूण-हिरवी मिरची पेस्ट- दीड चमचा, कोथिंबीर चिरून- अर्धी वाटी, लाल तिखट- अर्धा चमचा, हळद- अर्धा चमचा, गरम मसाला- १ चमचा, तेल- २ चमचे, पुदिना चटणी- २ चमचे, चाट मसाला- १ चमचा, मीठ- चवीनुसार, पोळीसाठी- गव्हाचं पीठ- २ वाट्या, तेल- अर्धा चमचा.



**कृती:** सारणासाठी- सोया ग्रानुल्स ४ वाट्या गरम पाण्यात १५ मिनिटे बुडवून ठेवा. कांदा, टोमॅटो चिरून घ्या. सोया मधील जास्तीचं पाणी पिळून काढून टाका. पॅनमध्ये तेलावर निम्मा कांदा सोनेरी होईपर्यंत परतून घ्या. आलं, लसूण, हिरवी मिरची पेस्ट परतून घ्या. सोया ग्रानुल्स घालून परता. हळद, लाल तिखट, गरम मसाला घाला, परता. टॉमॅटो, मीठ घालून शिजेपर्यंत परता. गॅसवरून उतरवून कोथिंबीर घाला. पोळीसाठी कणिक भिजवून घ्या. १५ मिनिटांनी पोळी लाटून भाजून घ्या. गरम असतानाच व्हेज खिम्याचे मिश्रण, पोळीच्या मधोमध पसरा. चिरलेला कच्चा कांदा, पुदिना चटणी, चाट मसाला घाला. गुंडाळून रोल तयार करा.

# नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

**नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.**

**कित्येक** शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.



▮नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.

▮खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

▮नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.

▮नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.



# जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे

▮सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामांपेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.

▮बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.

▮बदामाने काही काळ भूक भागवली जाते.

▮डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.

▮बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.

▮मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.

▮बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.

▮बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.

▮बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.

▮ बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

# लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

**वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.**

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या



माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.

वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. 'बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.' 'वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,' असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

# 'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच 'फार्मा सही दाम' नावाचे ॲप लॉंच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

**'फार्मा सही दाम' हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.**

**ॲप कसे काम करते?**

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पर्यायांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील. या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून 'ऑगमेंटिन' हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

**केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा**

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

**फेफरे (फिट्स) हा आजार आपल्या मेंदूशी संबंधित आहे. आपल्या मेंदूमध्ये अतिसुक्ष्म वाहिन्या असतात, त्यांना न्यूरॉन असे म्हटले जाते. न्यूरॉन आपापसात नेहमी संपर्कात असतात. एकमेकांना संदेशाचे आदानप्रदान करत असतात. संदेश वहन करण्याचे कार्य इतक्या प्रचंड वेगाने होत असते की, त्याने आपल्या मेंदूत रासायनिक व विद्युत तरंग निर्माण होतात. परंतु, एखाद्या संदेशाचे व्यवस्थित वहन न होता तो वाहिनीत अडकून पडतो. मेंदूचे संतुलन बिघडते व त्यामुळे आपल्याला फिट्स येतात. पण घाबरून जाऊ नका. फिट्सवर घरगुती उपचार आहेत.**

# फिट्स आल्यास घाबरू नये

**फिट्स** दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळाची नसते. ती केव्हाही व कोणत्याही वयाच्या व्यक्तीला येऊ शकते. अचानक आपल्याला चक्कर येऊन आपण जमिनीवर पडतो व शुद्ध हरपते. फिट्स आल्यानंतर आपल्या हातापायात कंप निर्माण होतात. तोंडातून फेस येतो. वारंवार फिट्स येत असेल तर आपल्याला खालील टिप्स उपयोगी पडू शकतात.

▮ अक्कलकाढा १०० ग्रॅम व लिंबू सत्त १०० ग्रॅम यांचे मिश्रण मधामध्ये एकजीव करून ५ ग्रॅम प्रतिदिन सकाळी काहीही न खाण्यापूर्वी चाखल्याने फिट्स येणे कायमचे दूर होते.

▮ सालवटीचे चूर्ण एक ग्रॅम प्रतिदिन मधासोबत चाखावे. त्यानंतर दूध प्यावे. असे नियमित केल्याने जुनाट फिट्स दूर होतात.

▮ शुद्ध हरपलेल्या व्यक्तीला लसूण कुटून वास दिल्यास तो शुद्धीवर येतो.

▮ रोज ३-५ लसणाच्या पाकळ्या दुधात टाकून ते प्यायल्याने फिट्स येत नाहीत.

# आरामदायक 'ट्रेंडी' पँट

**फॅशनच्या** जगात महिलांसाठी पँटचे पुनरागमन झाले आहे. पॅरिस फॅशन शो असो की लक्मे फॅशन वीक सगळीकडे पँट्स परिधान केलेल्या मॉडेल दिसू लागल्या आहेत. एवढंच नव्हे तर फॉर्मलशिवाय याचा उपयोग कॅजुअल्समध्ये देखील होताना दिसत आहे.

सध्या कॉर्पोरेट कल्चरमुळे कपडे घालण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल जाणावत आहे. मुली फॅशनसोबतच आरामालाही महत्त्व देत आहेत. म्हणूनच जीन्स-ट्राऊजरसारखे कपडे मुलींची पहिली पसंत झाली आहे. पिकनिक, आऊटिंग किंवा वीकेंडला जीन्स परिधान करताना दिसत आहेत. पण मीटिंग, कॉन्फरन्स, ऑफिशियल पार्टी किंवा सेमिनारच्या वातावरणात हे फिट बसत नाही. म्हणूनच मुलींनी आता पँट-ट्राऊजरला प्रमुख पोशाखांमध्ये सहभागी केले आहे. त्यातही विविध प्रकार आहेत. - ट्राऊजर, सिक्स पॉकेट, कार्गो, बूट कट आदी.



तुम्ही ऑफिस व्यतिरिक्त टी पार्टी किंवा डिनर पार्टीत सिल्क शर्टासोबत पँट परिधान करू शकता.

पँट आरामदायक असल्यामुळे हल्ली मोठ्या इन्स्टिट्यूटनी शर्ट-पँट हा युनिफॉर्म म्हणून स्वीकारला आहे. एअरलाइन्स, हॉस्पिटलच्या व्यतिक्ति काही बँका आणि कॉलेजमध्ये आता मुली युनिफॉर्म म्हणून पँट-शर्ट परिधान करायला लागल्या आहेत. त्याने स्मार्टनेस वाढतोच आणि धावपळीची कामे सोपी होतात. पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसते. तसेच त्यावर बीडसची माळ, डायमंड नेकलेस किंवा नेकपीस, ब्रेसलेट, लेदर बेल्ट, कॉर्पोरेट बॅग्जपासून क्लच आणि पर्स हेही मॅच होते. पँट परिधान केल्यास लेदर शूज, सँडल, ट्रेंडी चप्पलसुद्धा परिधान शकता. त्याचबरोबर आपण पिकनिक आणि खेळण्यासाठी कार्गो किंवा सिंपल बूट कट देखील वापरू शकता.

**पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसतो.**



# वेळ सत्कारणी लावा

**बयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषत: वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठरावीक पदार्थाचा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आई-वडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले-मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सोप्या गोष्टी करता येणे शक्य आहे.



# वाढतं वजन थांबवायचंय ? मग आहारात करा या घटकांचा समावेश

**बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतं वजन ही प्रत्येकाची समस्या झाली आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्याचा अनेक जण वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतात. अनेक वेळा डाएट करूनही वाढलेल्या वजनाला आळा बसत नाही. अशा वेळी आहारामध्ये वजन कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करायला हवा. या पदार्थांच्या सेवनामुळे वारंवार लागणाऱ्या भुकेला आळा बसतो.परिणामी वजन लवकर वाढत नाही. असेच काही पदार्थ रुपम सिन्हा यांनी सांगितले आहेत.**

**लाल मिरची**

रोजच्या जेवणाला झणझणीतपणा येण्यासाठी अनेक वेळा गृहिणी भाजी, आमटीमध्ये लाल मिरची किंवा लाल तिखटाचा वापर करतात. मात्र जेवणाची रंगत वाढवणारी लाल मिरची वजन कमी करण्यासाठीदेखील तितकीच उपयोगी आहे. लाल मिरचीमध्ये कॅप्सेकीन संयुग असतात. कॅप्सॅकीनमुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. परिणामी वाढत्या वजनाला आळा बसतो.

**लसूण**

एखाद्या पदार्थाला खमंग फोडणी द्यायची असेल लसूण गरजेचाच आहे. मात्र लसणाचा उपयोग केवळ जेवणासाठीच होत नसून आजारपणातही होतो. अनेक वेळा आजारपणामध्ये लसणाचा वापर औषध म्हणून केला जातो. त्याप्रमाणेच वजन कमी करण्यासाठीदेखील लसणाचा उपयोग होतो. जेवणामध्ये लसणाचा समावेश असेल तर जेवताना पोट भरलंय ही भावना मस्तिष्कापर्यंत पोहोचवण्याचं काम लसूण करतो. त्यामुळे पोट भरल्यानंतर आपण आपोआप जेवायचं थांबवतो. त्यामुळे आहारात लसणाचा समावेश करायला हवा. त्यासोबतच रक्ताच्या गुठळ्या होण्यापासून लसूण मदत करतो. तर हृदयाचे आरोग्यही नीट राहते.



**लाल आणि हिरवी मिरची**

मसाल्याच्या पदार्थांमधील महत्त्वाचा घटक म्हणजे मिरची. लाल मिरचीप्रमाणेच सुकी लाल मिरची किंवा हिरवी मिरची यांचाही तितकाच शरीराला फायदा होतो. मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, सीसोबतच बीटा कॅरोटिन असतं. त्यामुळे योग्य प्रमाणात मिरचीचं सेवन केलं तर पचनक्रिया सुधारते आणि भूक नियंत्रणात राहते.

**दालचिनी**

भूक नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम दालचिनी करत असते. दालचिनीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. त्यासोबतच दालचिनीच्या सेवनामुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. दालचिनीमुळे धमन्यांचं कार्यही सुधारते आणि शरीरातील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात आणली जाते.

**कोकम (आमसूल)**

आंबट, चटपटीत अशी चव असणाऱ्या कोकमाचे अनेक फायदे आहेत. भूक नियंत्रणात आणण्यासाठी कोकमचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे जेवणापूर्वी रोज एक कोकम खावं.

# चव वाढवणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

**गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढवणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्त्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफुलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे**

**वाढत्या वयाची लक्षणे थांबवण्यासाठी**

वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करून वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्त्वाचं काम करत असतं. चक्रीफूल



वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी'चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यासोबतच त्यात अँटीऑक्सिडंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रॅडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूल करते.

**सर्दी-खोकल्यावर गुणकारी**

कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतर लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफुलामध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढवण्याचं काम चक्रीफूल करते.

**पचनक्रिया सुधारते**

उशिरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होतात. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफुलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफुलाचा समावेश करायला हवा.

# प्रकल्पग्रस्तांना त्रास नको! जमीन संपादनाप्रकरणी मुख्यमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना आदेश

**■ बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे**

राज्यात पायाभूत सुविधा तसेच औद्योगिक विकासासाठी भूसंपादन प्रक्रिया राबवण्यात येत आहे. ही प्रक्रिया गतीने आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी, प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विविध प्रकल्पांसाठी सुरू असलेल्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

राज्यात औद्योगिक विकासासाठी विविध विभागांमध्ये एकूण ८,९६९ एकर क्षेत्र उपलब्ध असून नव्याने २०,४३१ एकर जमीन ताब्यात घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी मोठी मागणी येत असून उद्योजकांना लागणाऱ्या जागेचा विचार करून एमआयडीसीने एक लाख एकर जागा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. मुंबई-पुणे-नागपूरबरोबरच नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आदी भागांमध्ये गुंतवणूकदारांकडून जमिनीची मागणी वाढत आहे. याद्दष्टीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादनाच्या कामांना गती द्यावी, यासाठी शासनस्तरावरून आवश्यक ते सहाय्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विविध जिल्ह्यातील ह्यएमआयडीसीह्णच्या




**परवानगी 'एक खिडकी'द्वारे**

देशाला २०३० पर्यंत लाइव्ह मनोरंजन क्षेत्रातील जागतिक केंद्र बनवण्यात येणार आहे. यासाठी विशेष 'कृती आराखडा' तयार करणार असून यासाठी 'डीजीआयपीआरची' नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती केली आहे. आयोजकांना सर्व परवानग्या 'एक खिडकी'द्वारे देण्यात येणार आहेत.

भूसंपादनासह शक्तिपीठ एक्स्प्रेस-वे, विरार-अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, नागपूर-गोंदिया एक्स्प्रेस-वे, भंडारा-गडचिरोली एक्स्प्रेस-वे, नागपूर-चंद्रपूर एक्स्प्रेस-वे, नवेगाव-सुरजागड मिनरल कॉरिडॉर, जालना नांदेड एक्स्प्रेस-वे आदी प्रकल्पांच्या सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेचाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आढावा घेतला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सुरू असलेले सर्व प्रकल्प येत्या तीन वर्षांत पूर्ण होतील, असे नियोजन करावे. यासाठी भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. त्याचबरोबर वनक्षेत्र नसलेल्या जास्तीत जास्त सलग जागेचे भूसंपादन करून ती उद्योजकांना उपलब्ध करून द्यावीत. याशिवाय, विविध विभागाकडील शासकीय जमिनी औद्योगिक वापरासाठी विनामूल्य हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करावा, यामुळे उद्योजकांना कमी दरात भूखंड उपलब्ध होऊन राज्यातील औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी, कोकणातील भूसंपादन प्रक्रियेदरम्यान कुठेही वन जमिनीचे संपादन केले नसल्याची माहिती दिली. चंद्रपूर जिल्ह्यातील अतिरिक्त गोंडपिंपरी औद्योगिक क्षेत्रात उद्योजकास जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने उपस्थित केलेल्या त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव मान्यतेसाठी प्राप्त झाला आहे. या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल, असेही त्यांनी उद्योगमंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले. बैठकीत 'एमआयडीसी' आणि 'एमएसआरडीसी'च्या वतीने विविध ठिकाणी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली.

या बैठकीस उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासु, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

## 'शक्तिपीठ'चा खर्च १ लाख कोटी
### महामार्ग आता १२ ऐवजी १३ जिल्ह्यांतून जाणार



**शक्तिपीठ महामार्ग**

- महामार्गाच्या आखणीत बदल झाल्याने ८०२ किमीचा महामार्ग आता ८५६ किमीचा होणार
- प्रकल्पाच्या भूसंपादनाचा खर्च राज्य सरकार उचलणार, भूसंपादनासाठी कर्ज घेणार
- ३९५ गावांपैकी १४६ गावांची संयुक्त जमीन मोजणी पूर्ण
- अंबाबाई (कोल्हापूर), तुळजापूर (धाराशिव), माहूर (नांदेड) शक्तिपीठे जोडली जाणार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विरोधामुळे वादग्रस्त ठरलेल्या राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'शक्तिपीठ' महामार्गाच्या आखणीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) बदल केला आहे. या बदलात भूसंपादनासाठी विरोध असलेल्या कागल आणि हातकणंगले तालुक्याचा मोठा भाग वगळण्यात आला आहे. याशिवाय हा महामार्ग १२ ऐवजी आता १३ जिल्ह्यांतून जाणार असल्याने शक्तिपीठच्या खर्चात तब्बल १५ हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे. परिणामी प्रकल्पाचा खर्च ८६ हजार कोटींवरून १ लाख १ हजार कोटींवर पोहचला आहे.

वर्धा जिल्ह्यातील पवनार ते गोव्यातील पात्रादेवीला जोडणाऱ्या शक्तिपीठ द्रुतगती महामार्गाच्या भूसंपादनाला कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी विरोध केला होता. हा विरोध लक्षात घेऊन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने महामार्ग प्रकल्पाच्या आखणीत बदल करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार एमएसआरडीसीने महामार्गाच्या आखणीत बदल करून सुधारित प्रस्ताव राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठवला आहे. मंत्रालयात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या प्रस्तावाची तपासणी सुरू आहे.

सुरुवातीच्या नियोजनानुसार शक्तिपीठ महामार्ग हा कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर, शिरोळ, हातकणंगले, कागल येथून जाणार होता. शेतकऱ्यांच्या विरोधामुळे बहुतांश भाग यातून वगळण्यात आला आहे.

**शनिवारपासून समृद्धी महामार्गावर ब्लॉक**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर वाशिम व बुलढाणा जिल्ह्यात गॅन्ट्री उभारण्यासाठी ७ ते २३ फेब्रुवारीपर्यंत ब्लॉक घेण्यात आला आहे. हे काम ३५ टप्प्यांत प्रस्तावित आहे. वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये ही कामे करण्यात येणार असून प्रत्येक संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांच्या कालावधीकरिता पूर्ण थांबविण्यात येणार आहे. वाशिम जिल्ह्यातील तालुका कारंजा (लाड), तालुका मंगरूळपीर, तालुका मालेगांव आणि बुलढाणा जिल्ह्यातील तालुका मेहकरमधून जाणाऱ्या १७८+९०० ते कि.मी. २९०+४०० दरम्यान महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टमअंतर्गत ही गॅन्ट्री उभारली जाणार आहे. या कामांसाठी हा ब्लॉक घेण्यात आला आहे. ब्लॉक कालावधीत संबंधित ठिकाणी वाहतूक बंद करण्यात येणार आहे. काम पूर्ण झाल्यावर वाहतूक पुन्हा सुरू करण्यात येईल. महामंडळाने ब्लॉकचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

## महिला शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचे प्रशिक्षण मिळणार
### ९ जिल्ह्यांतील पाच हजारांहून अधिक लाभार्थी

महाराष्ट्रातील शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक आहे. गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतचा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या राज्य शासनाच्या कटिबद्धतेचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम-उमेद) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील पाच हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे.

**महिला शेतकरी सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी हे आपल्या राज्याचा कणा आहेत. हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असून, त्यातील अनेक कुटुंबांचे नेतृत्व कर्तृत्ववान महिला करत आहेत. अशा शेतकऱ्यांना सुलभ कर्ज आणि आवश्यक मदत वेळेवर मिळावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतची भागीदारी ही शाश्वत कृषी पद्धती आणि लैंगिक समावेशनाबाबत आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती पद्धती, बाजारपेठेतील संधी आणि माहितीपूर्ण निर्णयक्षमतेस सक्षम करून, हा उपक्रम महाराष्ट्रातील शेती उत्पादनक्षमता, उपजीविका आणि ग्रामीण टिकाऊपणा यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधण्याचा यशस्वी प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**उपक्रमाची उपयुक्तता**

संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर हा तीन वर्षांचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील ५ हजारहून अधिक महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी गोदरेज ॲग्रोव्हेट आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे.



**महिला शेतकरी, स्वयंसहाय्यता गटांना होणार लाभ**

योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. ५० हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ घेणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा उपक्रम ५०० हून अधिक स्वयंसहाय्यता गटांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे तसेच कापसाबरोबरच मका व इतर पीक उत्पादक शेतकऱ्यांपर्यंतही हा उपक्रम पोहोचवण्याचा मानस आहे. गोदरेज ॲग्रोव्हेटकडून प्रशिक्षण कार्यशाळा, प्रात्यक्षिक शेतजमिनी, शेतकरी क्षेत्रशाळा व सुरक्षितता किट्स पुरवण्यात येणार आहेत. या सामंजस्य करारांतर्गत, गोदरेज ॲग्रोवेट आणि एमएसआरएलएम उमेद संयुक्तपणे जीएपी, आपीएम आणि सुरक्षितता पद्धतींवरील प्रशिक्षण कार्यशाळा, शेतकरी क्षेत्रीय शाळा, प्रात्यक्षिक प्लॉट्स आणि सुरक्षितता किट्सचे वितरण करणार आहेत.

**५० हजार एकर क्षेत्रावर ५ हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ**

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या ९ जिल्ह्यांचा समावेश आहे. सुमारे ५० हजार एकर क्षेत्रावर ५ हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ घेणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा उपक्रम ५०० हून अधिक स्वयंसहायता गटांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. तसेच कापसाबरोबरच मका व इतर पिकांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे. या कराराअंतर्गत एमएसआरएलएमझ्रउमेदकडून स्वयंसहायता गट व कृषी सखी नेटवर्कद्वारे महिला शेतकऱ्यांचे संघटन व समन्वय साधला जाणार आहे. तर गोदरेज ॲग्रोव्हेटकडून प्रशिक्षण कार्यशाळा, प्रात्यक्षिक शेतजमिनी, शेतकरी क्षेत्रशाळा व सुरक्षितता किट्स पुरवण्यात येणार आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत, गोदरेज ॲग्रोवेट आणि टरफछट-उमेद संयुक्तपणे ऋअढ, र्कढट आणि सुरक्षितता पद्धतींवरील प्रशिक्षण कार्यशाळा, शेतकरी क्षेत्रीय शाळा (ऋर्ीी१ ऋ ि'ींूङ्ग'२), प्रात्यक्षिक प्लॉट्स आणि सुरक्षितता किट्सचे वितरण करणार आहेत.

## पार्किंग चार्जेसवरून हुतात्मा स्मारकाजवळ बेधडक लूट, दोघांना अटक... विनाशुल्क पार्किंगसाठी प्रतितास रु.५०० वसुली

**■मुंबई। प्रतिनिधी,**

दक्षिण मुंबईतील हुतात्मा चौकसारख्या वर्दळीच्या परिसरात बेकायदेशीर पार्किंगसाठी कारमालकांकडून प्रति तास तब्बल ५०० रुपये वसुल केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे येथे पार्किंग विनाशुल्क असूनही मुंबई महापालिकेच्या नावाने वसुली केली जात आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून ए वॉर्डमधील लिपिक जितेंद्र रामचंद्र वलाईकर (५२) यांनी एमआरए मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ही घटना ३१ जानेवारी रोजी घडली.

वलाईकर दुपारी साडेबारा वाजता गस्तीवर असताना हुतात्मा चौकात पोहोचले. तेव्हा काही तरुण पार्किंगच्या नावाखाली खासगी वाहनांकडून पार्किंगसाठी उघडपणे पैसे घेताना दिसले. त्यांनी चौकशी केली असता त्यांच्याकडून ह्यवेल टॅग्जह्ण असे लेबल असलेल्या पावत्या जप्त करण्यात आल्या. गंभीर बाब म्हणजे त्यांचा बीएमसी किंवा कोणत्याही अधिकृत एजन्सीशी कोणताही संबंध नसल्याचे आढळून आले. याबाबत वलाईकर यांनी अधिक चौकशी करूनही त्यांना समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्याचवेळी दोन वाहनमालकांनी पुढे येत पार्किंगसाठी प्रति तास दीडशे रुपये आकारल्याचे सांगितले. तर इतर वाहनमालकांनी चारचाकी वाहनांना प्रति तास ५०० रुपयांपर्यंत शुल्क आकारले जात असलाचा आरोप केला.




मुंबई महापालिकेचे रस्ते दुरुस्ती विभाग, ए वॉर्डमधील लिपिक जितेंद्र रामचंद्र वलाईकर ३१ जानेवारी रोजी ए वॉर्ड परिसरात गस्त घालत होते. हुतात्मा चौक ते डीएन रोड दरम्यानच्या परिसरात पार्किंग केले जात आहे का, फोर्ट परिसरातील पार्किंग व्यवस्था नियमांनुसार आहे का, पार्किंग कर्मचाऱ्यांकडे अधिकृत ओळखपत्रे आणि निर्धारित ड्रेस कोड आहे का आणि बेकायदेशीर पार्किंग शुल्क वसूल केले जात आहे का, याची चौकशी करण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले होते.

प्रकरणाचे गांभीर्य ओळखून वलाईकरांनी घटनास्थळी उपस्थित दोन्ही तरुणांना तत्काळ ताब्यात घेतले आणि त्यांना एमआरए मार्ग पोलीस ठाण्याकडे सोपवले. अटक केलेल्या आरोपींची नावे अमित मनोज सोनी (१८) आणि क्रिश कौशल किशोर गुप्ता (१८) अशी आहेत. बीएमसीने दाखल केलेल्या तक्रारीत स्पष्टपणे म्हटले आहे की, आरोपींनी सार्वजनिक पार्किंग जागा खासगी असल्याचे सांगून बेकायदेशीरपणे शुल्क वसूल केले.

ही महापालिकेची आणि मुंबईकरांची फसवणूक आहे. या तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांची चौकशी सुरू केली आहे. तसेच या बेकायदेशीर वसुलीमागे संघटित टोळी कार्यरत आहे का, याचाही शोध पोलीस घेत आहेत.

## सुरक्षारक्षकानेच मारला डल्ला
### मलबार हिलमध्ये १७ लाखांचा ऐवज लंपास

**■मुंबई।प्रतिनिधी,**

मुंबईतील सर्वात उच्चभ्रू आणि प्रतिष्ठित मलबार हिल भागातील एक खळबळजनक चोरीची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात कुंपणानेच शेत खाल्ले म्हणजेच सुरक्षारक्षकच चोर बनला. 'कल्पवृक्ष' या हाय प्रोफाइल निवासी इमारतीत तैनात असलेल्या एका सुरक्षारक्षकाने विश्वास तोडला आणि सुमारे १७ लाख रुपयांच्या मौल्यवाव वस्तूंची बॅग घेऊन पळ काढला.

संपूर्ण घटना २८ जानेवारी रोजी सुरू झाली. इमारतीत राहणारे अशोक गजरा यांच्या कुटुंबाने सांताक्रूझला काही मौल्यवान वस्तू पाठवण्याची तयारी केली. अशोक गजरा यांच्या पत्नी सरोजबेन यांनी त्यांचा भाऊ हरेश सांजाकिया यांच्या घरी पाठवण्यासाठी सहा बॅगा तयार केल्या होत्या.

तथापि, त्याच्या व्यग्र वेळापत्रकामुळे, हरेश त्या दिवशी बॅगा उचलू शकले नाहीत आणि दुसऱ्या दिवशी ते स्वतः येऊन त्या घेऊन जातील, असे ठरले होते. सुरक्षेच्या कारणास्तव, या सर्व बॅगा तात्पुरत्या स्वरुपात सफाई कर्मचारी पन्नालाल यांच्या खोलीत ठेवण्यात आल्या होत्या. पण कुणालाही किंचितही संशय आला नाही की, शेजारी बसलेला सुरक्षारक्षक रामदेव सिंग याचे पन्नालालच्या घरात ठेवलेल्या बॅगवर लक्ष होते.




दुसऱ्या दिवशी, २९ जानेवारी रोजी, जेव्हा हरेश सांजाकिया दुपारी त्याचे सामान घेण्यासाठी आले तेव्हा त्याच्या गाडीत पाच बॅगा ठेवल्या होत्या. इमारतीतील कोणीतरी सहाव्या बॅगेबद्दल विचारले तेव्हा ती बॅग सुरक्षारक्षक रामदेव सिंगच्या खोलीत असल्याचे सांगण्यात आले. रामदेव सिंग जेवायला गेला होता. हरेश यांना सांगण्यात आले की, रामदेव सिंग परत आल्यावर बॅग त्यांच्या गाडीत ठेवेल. सुमारे दीड तास वाट पाहिल्यानंतरही रामदेव परतला नाही आणि त्याचा मोबाईल फोनही बंद होता, तेव्हा त्याच्यावर संशय येऊ लागला.


दोन दिवस आरोपी रामदेव सिंगचा पत्ता न लागल्याने, कुटुंबाने ३१ जानेवारी रोजी पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी बॅगांबद्दल माहिती घेतली असता त्यात १२ लाख रुपये रोख आणि अंदाजे ५ लाख रुपयांची तीन मौल्यवान रोलेक्स घड्याळे असल्याचे कळले. आरोपीने एकूण १७ लाख रुपयांची चोरी झाल्याचे उघड झाले. मलबार हिल पोलिसांनी आरोपी रामदेव सिंगविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस पथक सीसीटीव्ही फुटेज तपासत आहे आणि त्याच्या मोबाइल लोकेशनवरून आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे.

## रुजू होऊन आठवडाही झाला नाही अन् २६ वर्षीय निवासी डॉक्टरनं हॉटेलमध्ये संपवलं आयुष्य

**■नागपूर। प्रतिनिधी,**

शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) एका २६ वर्षीय निवासी डॉक्टरने सोमवारी सकाळी एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. या धक्कादायक घटनेमुळे नागपूरच्या वैद्यकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे. मृत डॉक्टर हा नेत्ररोग विभागात कार्यरत होता आणि त्याने नुकताच पदव्युत्तर अभ्यासासाठी प्रवेश घेतला होता. सोमवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात शोककळा पसरली आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही, मात्र एका तरुण आणि होतकरू डॉक्टरच्या अशा जाण्याने त्याच्या सहकारी डॉक्टरांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. गणेशपेठ पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून घटनेचा सखोल तपास सुरू केला आहे.



**तरुण डॉक्टरच्या आत्महत्येने वैद्यकीय वर्तुळात मोठी खळबळ**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील (मेडिकल) एका तरुण निवासी डॉक्टरने सोमवारी सकाळी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पदव्युत्तर शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगून नुकताच प्रवेश घेतलेल्या या २६ वर्षीय डॉक्टरच्या अकाली निधनाने वैद्यकीय क्षेत्रात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. हा डॉक्टर नेत्ररोग विभागात कार्यरत होता. सोमवारी सकाळी शहरातील एका हॉटेलमध्ये त्याने टोकाचे पाऊल उचलले. ही घटना उघडकीस येताच सहकारी डॉक्टरांमध्ये आणि मेडिकल परिसरात शोककळा पसरली आहे. अभ्यासू आणि तरुण सहकाऱ्याच्या अशा अचानक जाण्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आले नसून, गणेशपेठ पोलिसांनी या प्रकरणाची नोंद केली आहे. पोलीस सध्या विविध अंगांनी तपास करत असून लवकरच या घटनेचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

**रुजू होऊन आठवडाही झाला नाही अन्न...**

बुलढाणा येथील रहिवासी असलेले २६ वर्षीय तरुण निवासी डॉक्टर ऋत्विक सागर ठाकूर यांच्या आत्महत्येच्या वृत्ताने नागपूर मेडिकलसह वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. ऋत्विक यांनी मुंबईतील प्रसिद्ध के.ई.एम. रुग्णालयातून आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले होते. त्यांचे दोन्ही पालकही डॉक्टर असून, ऋत्विक यांनी नुकताच २७ जानेवारी २०२६ रोजी नागपूर मेडिकलच्या नेत्ररोग विभागात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. नेत्ररोग विभागाचे प्रमुख डॉ. दिलीप उमरे यांच्या युनिटमध्ये कार्यरत असलेले ऋत्विक सोमवारी हॉस्पिटलमध्ये गैरहजर होते. त्यामुळे डॉ. उमरे यांनी त्यांच्या वडिलांशी संपर्क साधला. वडिलांनी वारंवार फोन करूनही ऋत्विकने प्रतिसाद न दिल्याने संशय बळावला. अखेर त्यांनी ज्या हॉटेलमध्ये ऋत्विक थांबले होते, तिथल्या व्यवस्थापनाला माहिती दिली. हॉटेल कर्मचाऱ्यांच्या हाकेलाही प्रतिसाद न मिळाल्याने पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला, तेव्हा ऋत्विक यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. घटनेची माहिती मिळताच गणेशपेठ पोलिसांनी घटनास्थळ गाठले. प्राथमिक तपासात कोणतीही सुसाईड नोट सापडलेली नाही. त्यामुळे अवघ्या काही दिवसांपूर्वीच प्रवेश घेतलेल्या या तरुण डॉक्टरने टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत.

**डॉक्टर पालकांचा एकुलता एक आधार हरपला**

बुलढाणा येथील मूळ रहिवासी आणि नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी डॉक्टर ऋत्विक सागर ठाकूर (२६) यांनी सोमवारी सकाळी एका हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, ऋत्विक यांनी केवळ ७ दिवसांपूर्वीच, म्हणजेच २७ जानेवारी २०२६ रोजी नेत्ररोग विभागात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. ऋत्विक यांचे दोन्ही पालक व्यवसायाने डॉक्टर असून, त्यांनी स्वतः मुंबईतील नामांकित के.ई.एम. रुग्णालयातून एमबीबीएस पूर्ण केले होते. उच्च शिक्षणासाठी ते नागपुरात डॉ. दिलीप उमरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत होते. सध्या कॉलेजच्या वसतिगृहात जागा मिळेपर्यंत ते गणेशपेठ बसस्थानकाजवळील एका हॉटेलमध्ये मुक्कासाला होते. सोमवारी ऋत्विक कर्तव्यावर हजर न झाल्याने विभागप्रमुख डॉ. उमरे यांनी त्यांच्या वडिलांशी संपर्क साधला. वडिलांनी केलेल्या वारंवार फोनला ऋत्विकने प्रतिसाद न दिल्याने संशय बळावला. अखेर हॉटेल व्यवस्थापनाच्या मदतीने आणि पोलिसांच्या उपस्थितीत रूमचा दरवाजा तोडला असता, ऋत्विक यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेमुळे संपूर्ण वैद्यकीय वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली असून, गणेशपेठ पोलीस आत्महत्येच्या कारणांचा शोध

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com